# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

जा.क्र.मप्रनि/आस्था/ब- १९०० 
कल्पतरु पॉईंट, २ रा मजला,
सायन माटुंगा स्किम रोड क्र.८,
सायन सर्कल समोर, सायन (पूर्व)
मुंबई: ४०० ०२२.

दिनांक: १७ /०६/२०१३

## प रि प त्र क

शासनाच्या निवडणूक विभागात किंवा इतर जनहितार्थ कर्तव्ये पार पाडण्यासाठी काही वेळा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातील कर्मचारी/अधिकारी यांना प्रतिनियुक्तीने मागविण्यात येते, परंतू असे निर्दशनास आले आहे की, निवडणूक कामासाठी पाठविलेले कर्मचारी बराच कालावधी होऊनही मंडळाच्या सेवेत परत येत नाहीत किंवा परत येऊ इच्छित नाहीत.

तरी याद्वारे सर्व प्रादेशिक अधिकारी/ उप-प्रादेशिक अधिकारी तसेच प्रयोगशाळेच्या नियंत्रण अधिकाऱ्यांना कळविण्यात येते की यापूढे शासनाच्या निवडणूक विषयक किंवा इतर कामासाठी २ महिन्यांपेक्षा जास्त कालावधीकरीता एखादया कर्मचाऱ्यास प्रतिनियुक्तीवर पाठविले असल्यास त्यांच्या नियंत्रण अधिकाऱ्यांनी त्यांना मंडळात परत आणण्यासाठी त्यांच्या स्तरावर पाठपुरावा करावा व सदर बाब मुख्यालयाच्या देखील निदर्शनास आणावी जेणेकरुन मुख्यालयाच्या स्तरावरुन प्रकरणी कार्यवाही करणे शक्य होईल. तसेच प्रतिनियुक्तीवर पाठविलेल्या कर्मचाऱ्यांने सुध्दा सदर कालावधी लक्षात घेऊन मंडळाच्या सेवेत परत रूजू होण्यासाठी त्यांच्या कार्यालयाकडे पाठपुरावा करावा.

वरील प्रकरणी एखादया कर्मचारी/अधिकाऱ्यांच्या कडून हेतूपुरस्सर कसूर केल्याचे आढळून आल्यास अशा कर्मचाऱ्यांविरूध्द प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

सदर परिपत्रक तात्काळ प्रभावाने अंमलात येत आहे.

( राजीव कुमार मित्तल,भा.प्र.से.)
सदस्य सचिव

प्रत माहितीसाठी-

१. जल प्रदूषण निवारण अभियंता/हवा प्रदूषण निवारण अभियंता/प्रधान वैज्ञानिक अधिकारी
२. सहायक सचिव (तां)/मुख्य लेखा अधिकारी, मुंबई/वरिष्ठ विधी अधिकारी/वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी
३. वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी,मध्यवर्ती प्रयोगशाळा,निर्मलभवन,महापे, नवी मुंबई/औरंगाबाद
४. कार्यकारी अभियंता, म. प्र. नि. मंडळ, मुंबई
५. प्रादेशिक अधिकारी, मुख्यालय/प्रकल्प व योजना/मुंबई/ठाणे/कल्याण/रायगड/नवीमुंबई/ पूणे/नशिक/नागपूर/औरंगाबाद/कोल्हापूर/अमरावती/चंद्रपूर
६. उप-प्रादेशिक अधिकारी, मुंबई-१/मुंबई-२/मुंबई-३/मुंबई-४/ठाणे-१/ठाणे-२/तारापूर-१/ तारापूर-२/नवी मुंबई-१/नवीमुंबई-२/तळोजा/कल्याण-१/कल्याण-२/कल्याण-३/भिवंडी/ रायगड-१/रायगड-२/रायगड /महाड/कोल्हापूर/सांगली/रत्नागिरी/चिपळूण/पूणे-१/पूणे-२/ पिंपरी-चिंचवड/सातारा/सोलापूर/औरंगाबाद-१/औरंगाबाद-२/औरंगाबाद-३/नांदेड/नाशिक/ अहमदनगर/जळगाव-१/जळगाव-२/नागपूर-१/नागपूर-२/नागपूर-३/चंद्रपूर/अमरावती-१/ अमरावती-२/अकोला/परभणी/लातूर/भंडारा.
७.वैज्ञानिक अधिकारी,प्रादेशिक प्रयोगशाळा, नागपूर/नाशिक/पूणे/औरंगाबाद/चिपळूण/ठाणे/चंद्रपूर
८.विधी अधिकारी,विधीशाखा/सांख्यिकी अधिकारी/ सहायक लेखा अधिकारी,उपकरशाखा/ जनसंपर्क अधिकारी/भांडार अधीक्षक
९. खाजगी सचिव, अध्यक्ष कक्ष, म. प्र. नि. मंडळ/खाजगी सचिव, सदस्य सचिव कक्ष,म.प्र.नि.मंडळ, मुंबई
१०. संकेतस्थळ, पर्यावरण माहिती केंद्र, म. प्र. नि. मंडळ, मुंबई
११.परिपत्रक नस्ती- २०१३/मुख्य नस्ती- २०१३

C:\Documents and Settings\Administrator\My Documents\trupti2010\circular.doc